# मान्यवरांच्या नजरेतून 'छात्र प्रबोधन'चा दीपावली अंक

अंक भावला. कथा, कविता व इतर मजकूर छानच. शिवाय यावर्षी मुखपृष्ठ व आतील सजावट, विशेष भावली. 'छात्र प्रबोधन' जास्तीतजास्त वाचकांपर्यंत पोहोचतोय (तीस हजार खप ! ग्रेट!) आपणास व छात्र प्रबोधन परिवारास मनापासून शुभेच्छा !

दासू वैद्य (कवि, जालना)

अंक मिळाला. नेहमीप्रमाणे वेगळी व वैशिष्ट्यपूर्ण भूमिका आवडली. अंकातील संग्रहित मजकूर विचार प्रवर्तक, नवी माहिती देणारा आणि स्फूर्तिदायक आहे. नव्या पिढीला तर हा अंक अधिकच उल्हसित करणारा व आपणही काहीतरी करावे, अशा प्रेरणा देणारा वाटला.

नारायण सुर्वे (कवि, मुंबई)

लेखांची निवड, रचना फारच देखणी आहे. समाजातील तळागाळातील मुलांच्या कथा आणि व्यथा यांचे चित्रणही अंकात व्हावे, त्यांच्या कथा आपल्या मुलांना प्रेरक ठरतील.

फादर दिब्रिटो (लेखक, वसई)

कुमारांच्या संस्कारक्षम वयाचा विचार करता आपण एकही पैलू वगळलेला नाही. ज्ञान आणि रंजनाची इतकी छान सांगड घातलेली क्वचितच बघायला मिळते. पानाचा कोपरा न् कोपरा आपण उपयोगी लावला आहे. इतकी सुरेख अवतरणं ! असं वाटतं, सगळेच लोक हे संस्कार अंगी बाणवायला तयार झाले तर आपला समाज आणि देश म्हणजे स्वर्ग होऊन जाईल.

आशा कर्दळे (साहित्यिक, पुणे)

विविध आणि खऱ्या अर्थाने प्रबोधन करणाऱ्या विषयांना आपण स्पर्श केला आहे. अंधश्रद्धा घालवण्याची कथा, शास्त्रज्ञ परिचय, हस्तकला, आयुर्वेद, गणित असे अगणित विषय आपण मांडले आहेत. एका अर्थाने खऱ्या जीवनाला स्पर्श केला आहे.

वि. य. कुलकर्णी (लेखक, पुणे)

बाह्यांकाची सजावट आणि अंतरंगातील आशयसंपन्नता यामुळे अंक देखणा, वाचनीय, उद्बोधक झाला आहे. आपण नियोजन फार चांगल्या प्रकारे केले आहे. एक चांगला पायंडा आपण शिक्षण क्षेत्रांत निर्माण केला आहे. सातत्यानं ही परंपरा ठेवलीत तर तो एक 'माणदण्ड' होऊन राहील यांत शंका नाही.

उष:प्रभा पागे (गिर्यारोहक, पुणे)

अंकातील 'वेड जगणारी माणसं' या लेखमालेतील पौर्णिमा व दिलीप कुलकर्णी यांचे आयुष्य 'आमंत्रित' करणारे आहे.

अतुल कुलकर्णी (अभिनेता, मुंबई)

दिवाळी अंक छान झालाय. शैलजा देशमुख यांनी डॉ. जेन गुडाल यांचा वेधक परिचय करून दिलाय.

वीणा गवाणकर (लेखिका, वसई)

# मान्यवरांच्या प्रतिक्रिया



संवाद, अश्विनी धोंगडे, द. ता. भोसले, मंगला गोडबोले, संजीव नलावडे आणि कांचनगंगा गंधे यांचे लेखन फार आवडले, भावले. 'माझी जडणघडण' मध्ये डॉ. सरदेसाई आणि डॉ. भटकर यांनी साधलेला संवाद खूप छान आहे. 'छात्र प्रबोधन' हे निव्वळ मासिक नाही, ती एक चळवळ आहे ह्या विधानाशी मी पूर्णपणे सहमत आहे. प्रस्तुत दिवाळी अंक केवळ दिवाळी अंक नाही, ती एक मेजवानी आहे.

आपला

(श्री. द. महाजन)

---

Chhatra Prabodhan has maintained its excellence regarding the production of "Diwali Issue" in English too. Hearty Congratulations & Best Wishes, for proposed Monthly Edition.

Yours Sincerely

( Raja Limaye)

---

'Chhatra Prabodhan - English Diwali Issue -2004' was fabulous in 'infotainment'. Although I am 54 years old, I read it like a 16 year young boy ! Special praise to Neela kher for her poem 'The Voice of the Earth' and also her story 'Yes Boss'. All in all, a very good effort from the editorial team and all original contributors.

Yours Sincerely

(K. S. Kamath)

---

छात्र प्रबोधनचा अप्रतिम दिवाळी अंक मिळाला. मुखपृष्ठ इतके सुंदर की शब्द नाहीत. पान ही खरंच जीवन ज्योत आहे. पणतीमधील एका हिरव्या पानाने संपूर्ण विश्व कवेत आलं आहे. श्री. सतीश देशपांडेना अभिनंदन पोहोचवाल ना?

अंकाचे मुद्रण, कागद, पृष्ठसंख्या, साहित्य फक्त ३० रुपयांत हे स्वप्नच वाटतंय. तुम्ही खऱ्या अर्थाने मुलांना ही अक्षर दिवाळी देऊन खूप आनंद देत आहात. दिवाळी अंकाचा एवढा खप भारतीय भाषेत कुणाचा असेल का? शोध घ्यायला हवा!

आपल्या या अप्रतिम कर्तृत्वाबद्दल खूप खूप अभिनंदन! सर्वांना शुभेच्छा!

आपली

(लीला दीक्षित)

---

उद्बोधक, वाचनीय व विद्यार्थ्यांच्या उपक्रमशीलतेला चालना देणाऱ्या लेखांचा अंतर्भाव, छात्र प्रबोधनच्या दिवाळी अंकात केल्याबद्दल अभिनंदन! सोप्या शब्दांत मांडलेले उद्योजकांचे मनोगत व 'माझी जडणघडण' मधील सर्व लेख विद्यार्थ्यांना स्फूर्तिदायक वाटतील. आदर्शानुसार जीवन व्यतीत करावे असे विचार ज्या वयात मनात येतात त्यावेळी असे आदर्श त्यांच्यापुढे ठेवले तर त्याचा उपयोग होईल अशी अपेक्षा ठेवण्यास हरकत नाही.

आपला

(विद्यानंद रानडे)

---

मा. सं. महेन्द्रकाका,

दीपावली अंकातील प्रा. उडुपी यांचा लेख फार आवडला. आवडला असे म्हणण्यापेक्षा उपयोगी पडला. कारण, माझे अक्षर पूर्वी चांगले होते. पण नंतर लिखाणाच्या आळसाने मी त्याकडे दुर्लक्ष केले आणि चांगले अक्षर काढणे मी जणू विसरूनच गेलो. पण लेखातील सुलेखनाचे नमुने पाहून 'आपण चांगले अक्षर का काढू नये?' असे वाटले व प्रयत्न केला आणि खरंच वाचण्याइतकेतरी चांगले अक्षर काढू शकलो.

कुमार वाचकाची प्रतिक्रिया

आपला

कु. अभय जय वैद्य

(विद्यार्थी)

तिशीखालील पिढी वाचत नाही तर फक्त पाहात असते असे म्हणतात. त्यामुळे मुलांसाठी अंक प्रसिद्ध करणे फार धाडसाचे असते. आपण ते आव्हान स्वीकारले आहे आणि समर्थपणे पेलले आहे. संपादन करताना वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगला गेला आहे. सर्वधर्म मैत्री हेही आपल्या देशापुढील एक आव्हान आहे. पुढच्या वर्षी त्यादृष्टीने नियोजन करता येईल. अंकाची मांडणी छान आहे. भरपूर चित्रे आहेत त्यामुळे मुलांना अंक वाचताना तो 'पाहाण्याचा' अनुभव येईल. आपणा सर्वांचे अभिनंदन !

फादर फ्रान्सिस दिब्रिटो
ज्येष्ठ लेखक, वसई

---

मुखपृष्ठापासून अंक देखणा आहे. आतील मांडणी आणि सजावट नेत्रसुखद तर लेख मनसुखद आहेत. 'ब्रिज ऑन दि रिव्हर क्वाय' चित्रपटावरील लेख वाचून मन भूतकाळात गेले. आणिबाणीत भूमिगत असताना हा चित्रपट मी पाहिला. त्यानंतरही चार वेळा पाहिला. 'कशी मी कसा मी' हा डॉ. अनघा लवळेकरांचा लेख उत्तम. बाल मनावर उत्तम संस्कार घडविणारा आहे. श्री. गाडगेबाबांवरील डॉ. द. ता. भोसले यांचाही लेख विचारप्रवृत्त करणारा वाटला. सर्वच लेखकांनी उत्तम लेखन केले आहे. आपला संपादकीय संच खूप चांगला आहे.

रमेश पतंगे, संपादक, साप्ताहिक विवेक, मुंबई

---

अंक नेहमीप्रमाणेच दर्जेदार वाचनीय व संस्कारांची समृद्धी असलेला आहे. तुमचा अंक कुमारांची व्यक्तिमत्त्वे घडविण्यास खूप उपयोगी पडणारा आहे. विषयांची विविधता आहे. नव्या-जुन्याचा मिलाफ आहे. ज्ञान-करमणूक दोन्ही साधलेली आहेत.

म. वि. कोल्हटकर, ज्येष्ठ लेखक, सातारा

# दीपावली विशेषांकासंदर्भात मान्यवरांच्या प्रतिक्रिया



*Kindly accept my heartiest congratulations and appriciation for bringing out an excellent Diwali special issue of Chhatra Prabodhan of 2006 in English.*

*I take this opportunity to mention that, year after year the English issue of Chhatra Prabodhan is improving on the various grounds like Maturity, Presentation, Quality of Articles and Information - In short it is a superb creation of youngsters under your able leadership*

*- All the best*

Yours Sincerely
Raja Limaye

***Capt. Raja Limaye***

*(Retd. Army Officer, Pune)*

---

अभिरुचिसंपन्न, सुसंस्कृत दिवाळी अंकांच्या पंक्तीत 'छात्र प्रबोधन'च्या 'युवा संवाद'ने पहिल्याच प्रयत्नात स्थान मिळवलेच आहे. नियोजित आवृत्ती हातोहात संपून पुनर्मुद्रणाकरिता जावे लागले हे आपण घेतलेल्या प्रयत्नांचे घवघवीत यशच म्हणायला हवे.

मा. कविवर्य दत्ता हलसगीकरांची सप्तरंगी सदाबहार तरुणाई, श्री. महेश केळुस्करांची नववर्षाची हर्षाची निळी मोकळी बोली खूपच भावली. अन्य सर्व लिखाणातली आशयघन मांडणी, छपाई व सजावट सर्वच चित्तवेधक झाले आहे.

अनिल साठ्ये, सुप्रसिद्ध कवी,मुंबई

---

चारही अंकांचं संपादन हे मोठं अवघड काम; पण तुमच्या सदैवच्या शिस्तबद्ध नियोजनानं अंक आशयसमृद्ध आणि नव्या पिढीला काही सकस देणारे झाले आहेत. पारंपरिक मजकुराहून काही निर्माणाचा ध्यास या अंकात आहे. अशा ध्येयप्रवण कार्यामुळेच काही नवे उगवून येते. मनःपूर्वक अभिनंदन.

पन्नास हजार अंक म्हणजे तेवढे वाचक. एवढ्या भूमीवर पाऊस रिमझिमला ... निश्चित काही हिरवे उमलून येईल. मनोरंजन, उद्बोधन हा हेतू असल्यामुळेच या अंकाला विशेष मोल आहे.

दत्ता हलसगीकर
ज्येष्ठ साहित्यिक, सोलापूर

---

या वेळी ग्रामीण मुलामुलींसाठी निवडक अशा ग्रामीण वातावरणाचा परिपोष करणाऱ्या साहित्याने भारलेला आणि स्वस्त अंक देऊन आपण उत्तम काम केले आहे. दोन्ही अंक छान आहेत.

हरिहर आठलेकर ,ज्येष्ठ लेखक, सावंतवाडी